अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार दि. ३० नोव्हेंबर २०२२ | वर्ष : २१ वे | अंक : ६४ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

विमानसेवेचा वाद पाडापाडीवरून तोडातोडीवर पोहचला

संघर्ष चिमणी हटाव विरुध्द चिमणी बचाव

सुराज्य/सोलापूर

सोलापूरच्या विकासासाठी होटगीरोड विमानतळावरून नियमित विमानसेवा सुरू झालीच पाहिजे, यासाठी सिध्देश्वर साखर कारखान्याच्या चिमणीचा अडथळा दूर केलाच पाहिजे, या मागणीसाठी एकीकडे सोलापुरातील व्यापारी एकवटले असून त्यासाठी त्यांनी 'चिमणी हटाव' आंदोलन उभारले आहे. दुसरीकडे चिमणी चिमणी पडली तर कारखाना बंद पडतो, कारखाना बंद पडला तर कारखान्याला ऊस देणाऱ्या शेतकऱ्यांची चूल बंद पडेल, म्हणून कारखाना वाचलाच पाहिजे यासाठी 'चिमणी बचाव' आंदोलन उभे राहत आहे. आता शेतकरी आक्रमक झाले असून पाडापाडीला तोडातोडीच्या भाषेत उत्तर देण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे विमानसेवेचा वाद आता पाडापाडीवरून तोडातोडीवर पोहचला आहे.

होटगीरोड विमानतळावरून नियमित विमानसेवा चालू झालीच पाहिजे, ही आग्रही मागणी करत सोलापूर विकास मंचच्या माध्यमातून आंदोलन उभारले आहे. गेल्या महिनाभरापासून त्यांचे चक्री उपोषण सुरू झाले आहे. त्यातच कारखाना बंद करण्याची नोटीस हरित लवादाने दिल्यामुळे या आंदोलनाला ताकद मिळाली आहे. सध्या कारखान्याचा गळीत हंगाम सुरू आहे. ऐन हंगामातच कारखाना बंद पडला तर कारखाना कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या ऊस गाळपाचा प्रश्न उपस्थित होणार आहे. त्यामुळे कारखाना वाचलाच पाहिजे; या मुद्यावर शेतकरी एकवटले असून त्यांनीही चक्री उपोषण सुरू केले आहे.

आंदोलन विरुध्द आंदोलन

विमानसेवेच्या मागणीसाठी सोलापूर विकास मंचच्या माध्यमातून जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारात पूनम गेटवर व्यापाऱ्यांचे चक्री उपोषण सुरू आहे. दुसरीकडे मंगळवारपासून शेतकरी आणि सभासदांनी उत्तर पंचायत समितीकडील प्रवेशद्वारावर चक्री उपोषण सुरू केले आहे. कारखान्याची चिमणी पाडून होटगीरोड विमानतळावरून विमानसेवा सुरू झाली पाहिजे, ही विकास मंचची मागणी आहे. चिमणी न पाडता बोरामणी विमानतळाचे काम तात्काळ सुरू करावे, अशी सभासद; शेतकऱ्यांची मागणी आहे.

शेतकरी कोयता घेऊन मागे लागतील

राज्यातील सहकार क्षेत्रासाठी आदर्श असलेल्या श्री सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याची चिमणी पाडून विमानसेवा सुरू करण्याची मागणी न्यायाची आहे का? कारखान्याच्या चिमणीला धक्का लावाल तर सोलापूर शहर बंद करू,विमानसेवेसाठी शेतकऱ्यांचे जीवन उद्धस्त करू पाहणाऱ्या मंडळींच्यामागे हातात कोयते घेऊन लागू तेव्हा त्यांना शेतकऱ्यांची खरी ताकद कळेल.

-शिवशरण पाटील (माजी आमदार)

त्यांचा बंदोबस्त करू

सोलापूरला विमानसेवा सुरू व्हावी ही आमचीही मागणी आहे. लाखो लोकांची उपजीविका असलेला सिध्देश्वर सहकारी साखर कारखाना बंद पाडण्याचा कोणी प्रयत्न करत असतील तर ते आम्ही कदापिही खपवून घेणार नाही. कारखान्याच्या विरुध्द पडद्यामागे राहून कारस्थान करणाऱ्यांनी पुढे यावे. त्यांचा आम्ही बंदोबस्त करू. कोणत्याही परिस्थितीत सिध्देश्वर कारखान्याला धक्का लागू देणार नाही.

- सिद्रामप्पा पाटील (माजी आमदार)

बोरामणी विमानतळासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज

सिध्देश्वर सहकारी साखर कारखाना हा शेतकऱ्यांसाठी कामधेनू असून त्यावर सुमारे दीड लाखांपेक्षा अधिक लोकांची उपजीविका अवलंबून आहे. विमानसेवेत कारखान्याची चिमणी अडथळा असल्याची सातत्याने मागणी लावून धरणाऱ्यांनी हा हेका सोडून बोरामणी आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी सामूहिकपणे प्रयत्न करायला हवा.

- प्रा. डॉ. रावसाहेब पाटील (अध्यक्ष : अ.भा.मराठी जैन साहित्य संमेलन)

तुकाराम मुंढे... कार्यमुक्त व्हा... शिंदे सरकारचा फतवा

सुराज्य/मुंबई

महाराष्ट्रातील धडाकेबाज प्रशासकीय अधिकारी अशी ओळख असणाऱ्या तुकाराम मुंढे यांची पुन्हा एकदा बदली करण्यात आली आहे. राज्यात शिंदे सरकार आल्यानंतर कुटुंब कल्याण तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबईच्या आयुक्तपदाची जबाबदारी देण्यात आली होती. राज्य सरकारच्या सामान्य प्रशासन विभागानं पुन्हा एकदा तुकाराम मुंढे यांना कार्यमुक्त होण्याचे आदेश दिले आहेत. तुकाराम मुंढे यांच्यासह आणखी काही अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

कुटुंब कल्याण तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबईचा कार्यभार सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्रधान सचिवांकडे तर, महाराष्ट्र राज्य एडस नियंत्रण सोसायटीचा कार्यभार देखील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्रधान सचिवांकडे सोपवून कार्यमुक्त होण्याचे आदेश काढले आहेत. कार्यमुक्त होऊन पुढील आदेशाची वाट पाहा, असं राज्य सरकारनं काढलेल्या आदेशात म्हटलं आहे. तुकाराम मुंढे यांनी सुरू केलेल्या धडक कामाची काही अधिकाऱ्यांनी राज्याच्या एका मंत्र्याकडे तक्रार केल्याची चर्चा सुरू होती.

त्यानंतर तुकाराम मुंढे यांना कार्यमुक्त करण्याच्या हालचाली झाल्याच्या चर्चा आहेत. तुकाराम मुंढे यांच्याकडे राष्ट्रीय आरोग्य अभियानाची जबाबदारी आल्यानंतर त्यांनी राज्यात ठिकठिकाणी दौरे केले होते. या दौऱ्यांच्या काळात जे अधिकारी आणि कर्मचारी बेजबाबदारपणे वागतील त्यांना मुंढे यांनी त्यांच्या खास शैलीत इशारा दिला होता. तुकाराम मुंढे यांच्या आक्रमक भूमिकेमुळं काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली होती. यातूनच काही अधिकाऱ्यांनी तुकाराम मुंढे यांच्यासंदर्भात आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांच्याकडे तक्रारी केल्याच्या चर्चा सुरू झाल्या होत्या. आरोग्यमंत्र्यांनी या संदर्भात तुकाराम मुंढे यांना सूचना देखील केल्याच्या बातम्या समोर आल्या होत्या. या सर्व बाबी समोर येऊन आठवडा होत असतानाच तुकाराम मुंढे यांना कार्यमुक्त होण्याचे आदेश देण्यात आले आहेत. विनय मून यांची भंडारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावरून परभणीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर बदली झाली आहे. सुनील चव्हाण यांची कृषी विभाग पुणेच्या आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. एस.एम.कुरकोटी यांच्याकडे भंडारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदी बदली करण्यात आली आहे.

सौम्या शर्मा यांची नांदेड जिल्ह्यातील देगलूर उपविभागातील सहायक जिल्हाधिकारी पदावरून नागपूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदी बदली करण्यात आली आहे.

या अधिकाऱ्यांच्या देखील बदल्या

डॉ. व्ही. एन. सूर्यवंशी यांची एमएमआरडीए मुंबईच्या अतिरिक्त आयुक्त पदावरून राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त म्हणून बदली करण्यात आली आहे. भाग्यश्री बानायतची साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डीच्या मुख्य कार्यकारी पदावरुन विदर्भ स्थायी विकास महामंडळ नागपूरच्या सचिवपदी बदली करण्यात आली.

अरण येथे ट्रकला धडकल्याने दुचाकीस्वार तरुण ठार

सोलापूर : वेगाने जाणारी मोटार ट्रकला पाठीमागून धडकल्याने मोटारीतील एक जण जागीच ठार तर ड्रायव्हर सह दोघेजण गंभीर जखमी झाले. हा अपघात सोमवारी सकाळी पुणे महामार्गावरील अरण येथे घडला.

सुयश सुभाष तिवारी (वय २२ रा. समता नगर, ठाणे) असे मयताचे नाव आहे. तर मोटारीचा चालक सुबोजीत संजीव नाग (वय २५ रा.मुंबई) आणि संकेत नवनाथ सुडके (रा.ढोकी जि.उस्मानाबाद) हे दोघे जखमी झाले. ते सगळे एमएच४३-बीजी-२६६० या मोटारीतून मुंबई येथून सोलापूरच्या दिशेने निघाले. सकाळी ६ वाजेच्या सुमारास अरण (ता.माढा) येथील पुलावर त्याच दिशेने जाणाऱ्या ट्रकला पाठीमागून धडकल्याने हा अपघात घडला. या घटनेची फिर्याद ट्रकचा चालक सेल्वकुमार कालियापन (रा. नामक्कल, तामिळनाडू) यांनी टेंभुर्णी पोलिसात दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी मोटारीचा चालक सुबोजित नाग (रा.मुंबई) याच्याविरुध्द गुन्हा दाखल केला. सहाय्यक फौजदार गुटाळ पुढील तपास करीत आहेत.

लाचखोर ग्रामविकास अधिकारी अॅन्टी करप्शनच्या जाळ्यात

सुराज्य/सोलापूर

शासकीय योजनेतील १५ व्या वित्त आयोगाच्या कामाचे बिल खात्यात जमा केल्याचे बक्षीस म्हणून एक लाखाची लाच मागणाऱ्या ग्रामविकास अधिकाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पडताळणी करून अटक केली. गोपीचंद दादा गवळी (वय-५६,पद-ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय बोराळे, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर, रा.अंकोली, ता.मोहोळ, जि.सोलापूर) यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली आहे.

यातील तक्रारदार याचे मित्र हे कॉन्ट्रक्टर असून, त्यांचे मित्राची मौजे बोराळे,ता.मंगळवेढा येथे शासकीय योजनेतील १५ व्या वित्त आयोगाच्या कामाचे व जिल्हा परिषद सेस निधी अंतर्गत केलेल्या कामाच्या बिलासंदर्भात तक्रारदार पाठपुरावा करीत होते.या कामाच्या बीलाची रक्कम खात्यात जमा केली बाबत ग्रामसेवक गोपीचंद गवळी यांनी तक्रारदार यांच्याकडे बक्षिस/मोबदला म्हणून १ लाख रुपये लाचेची मागणी करुन पहिला हप्ता ५० हजार रुपये मागणी केल्याचे पडताळणीत स्पष्ट झाल्यानेगोपीचंद गवळी यांना ताब्यात घेतले असून, गुरुवारी त्यांना न्यायालयात हजर करणार असल्याचे पोलीस निरीक्षक चंद्रकांत कोळी यांनी सांगितले.

ही कारवाई पोलीस निरीक्षक, लाप्रवि, सोलापूर, चंद्रकांत कोळी, पोलीस हवालदार प्रमोद पकाले, पोकॉ उमेश पवार, पोकॉ स्वप्निल सण्णके, चापोकॉ शाम सुरवसे सर्व नेमणुक अॅन्टी करप्शन व्युरो सोलापूर यांनी केली.

१५ हजार नवीन खासगी शाळांना परवानगी

मुंबई : एकनाथ शिंदे सरकारमध्ये १५ हजार नवीन खासगी शाळांना परवानगी देण्यात आली आहे. शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी याबाबतची माहिती दिली आहे. दरम्यान, संस्थाचालकांनी शिक्षक भरती करताना शिक्षकांपासून कोणतीही माहिती लपवून ठेवू नये, असेही शिक्षणमंत्र्यांनी बजावलं आहे. ते म्हणाले की, 'शाळा चालवणा-या खाजगी संस्थांवर आम्ही फार नियंत्रण ठेवत नाही.

कारण आमचे खालचे अधिकारी तुम्हाला त्रास देतील. पण याचा असा अर्थ नाही की तुम्ही काहीच निर्बंध पाळायचे नाहीत. विद्यार्थ्यांची फी आली नाही म्हणून त्या मुलाचा दाखला आडवतात किंवा त्याला बसमध्ये प्रवेश देत नाहीत. हे टाळलं पाहिजे. आमच्या काळात आम्ही १५ हजार नवीन शाळांना परवानगी दिली आहे. शिक्षकांना खरं सांगा की सरकारी नोकरी मिळणार नाही. विनाअनुदानित असणार आहे.

शिंदे सरकारच्या काळात १५ हजार खाजगी शाळांना परवानगी देण्यात आली आहे. या शाळा कायम विनाअनुदानित म्हणजे स्वयंअर्थसहायीत असतील. शिक्षकभरती करताना ही माहिती संस्थाचालकांनी शिक्षकांपासून लपवून ठेवू नका असं शिक्षणमंत्र्यांकडून बजावण्यात आलं आहे.

शिवसेना ठाकरे गटासोबतच्या युतीसाठी वंचित तयार

मुंबई : राज्यात पुन्हा एकदा शिवशक्ती-भीमशक्ती एकत्र येणार असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. वंचित बहुजन आघाडीने शिवसेना ठाकरे गटासोबत युती करण्याची घोषणा केली आहे.

शिवसेना ठाकरे गट आणि वंचित बहुजन आघाडीच्या युतीमुळे राज्यातील राजकीय समीकरणे बदलणार का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. उध्दव ठाकरे यांचे हिंदुत्व वैदिक नसून ते मान्य असल्याचे वक्तव्य वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केले होते. शिवसेनेसोबत युती करण्यासाठी काहीही हरकत नसल्याचे त्यांनी सांगितल्यानंतर शिवशक्ती आणि भीमशक्ती पुन्हा एकत्र येतील अशा चर्चा सुरू झाली होती.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

घसरडे कुटचे!!!

कल्याण
455-44-590

मेन बाजार
246-25-348

तुळजापूर तीर्थक्षेत्र आता रेल्वेच्या नकाशावर झळकणार

सोलापूर-तुळजापूर-उस्मानाबाद रेल्वेसाठी ४५२ कोटींचा निधी मंजूर

उस्मानाबाद : राज्य मंत्रीमंडळाच्या मंगळवारी झालेल्या बैठकीत सोलापूर - तुळजापूर-उस्मानाबाद रेल्वे मार्गासाठी राज्य सरकारने ४५२ कोटी ४६ लाख रुपये मंजूर केले. यामुळे तुळजापूर तीर्थक्षेत्र हे रेल्वेच्या नकाशावर येणार आहे. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे स्थानिकांमध्ये आणि भाविकांमध्ये आनंदाचं वातावरण आहे.

तुळजापूर तीर्थक्षेत्र हे रेल्वेने जोडले जावे ही मागणी गेल्या ४ दशकांपासूनची होती. ती आता सत्यात उतरताना दिसतेय. यापूर्वी सोलापूर - तुळजापूर - उस्मानाबाद रेल्वे मार्ग मंजूर झाला होता. त्याचे सर्वेक्षणही करण्यात आले होते. या रेल्वेसाठी तुळजापूर तालुक्यातील काही गावातील जमिनींचे अधिग्रहण करण्याचे काम सुरू होते. फक्त निधीमुळे या रेल्वे मार्गाचे काम संथ गतीने सुरू होते. आता मंत्रीमंडळाच्या बैठकीत ४५२ कोटी ४६ लाख रुपये निधी मंजूर केल्यामुळे या रेल्वे मार्गाला आता गती येणार आहे. भविष्यात भाविक तुळजा भवानीच्या दर्शनाला रेल्वेने दाखल होतील. तसेच या रेल्वे मार्गामुळे व्यापार आणि उद्योग व्यवसाय वाढण्यास मदत होईल. सोलापूर-तुळजापूर-उस्मानाबाद हा नवीन ब्रॉडगेज रेल्वे मार्ग फास्ट ट्रॅकवर आणण्यासाठी राज्य शासनाने आपल्या वाट्याचे ४५२ कोटी ४६ लाख रुपये आर्थिक सहभाग देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेतला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. या प्रकल्पासाठी ९०४ कोटी ९२ लाख इतका खर्च येणार असून ५० टक्के सहभाग राज्य शासनाचा आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजापूर येथे स्थानिक व इतर राज्यातून मोठ्या प्रमाणावर भाविक येतात. मात्र रेल्वेची सुविधा नसल्याने त्यांची गैरसोय होते म्हणून विविध लोकप्रतिनिधींनी अनेक वर्षांपासून मागणी केलेली होती. या रेल्वे मार्गाची लांबी ८४.४४ किमी असून यावर १० रेल्वे स्थानके असतील तसेच ४ वर्षात हा रेल्वे मार्ग पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

सोलापूर-तुळजापूर-उस्मानाबाद या ८४ किमीच्या रेल्वे मार्गाच्या कामास गती मिळाली आहे. ता. १ फेब्रुवारी रोजी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामण यांनी बजेट सादर केले. यामध्ये सोलापूर-उस्मानाबाद रेल्वेमार्गासाठी १० कोटी रुपये मिळाल्याने रेल्वेच्या कामास गती मिळत आहे. उस्मानाबाद येथून जमीन मोजणीचे कामास सुरूवात झाली आहे. पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि दक्षिण भारत अशा तीन शहरांना जोडला जाणारा महत्त्वपूर्ण मार्ग म्हणून सोलापूर -उस्मानाबाद मार्ग ओळखला जाणार आहे.